जनसंपर्क कक्ष
04 JAN 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाचे श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व सांगलीच्या संग्राम संस्थेच्यावतीने सोमवारी 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' या विषयावर आयोजित परिसंवादावेळी माहिती फलकाचे उद्घाटन पालकमंत्री सतेज पाटील व ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. भारती पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संग्राम संस्थेच्या प्रमुख मीना शेषू, प्रभारी महिला व बालविकास अधिकारी शिल्पा पाटील उपस्थित होत्या.

# स्त्री-पुरुष समानतेची बीजे शालेय जीवनात रुजवावीत

## सतेज पाटील : 'जबरदस्तीत कसली मर्दानगी'वर परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची पिढी निर्माण करावयाची असेल तर त्याची बीजे ही शालेय जीवनातच मुलांमध्ये रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र व सांगलीच्या संग्राम संस्थेच्या वतीने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सोमवारी आयोजित 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' या परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरीसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदा करावा लागतो. याचा अर्थ आपण सुसंस्कृत पिढी घडविण्यात कमी पडलो की काय, असा प्रश्न निर्माण होतो. भविष्यातील पिढी ही स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची निर्माण करायची असेल तर त्याची बीजे व संस्कार शालेय जीवनात रुजविणे गरजेचे आहे. या अभियानाची सुरुवात छत्रपती शाहू महाराजांच्या जिल्ह्यातून होत आहे, ही अभिमानस्पद बाब असल्याचे पाटील यांनी सांगितले.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, चूल आणि मूल या प्रवृत्तीमुळे भारतच काय आशिया खंड मागे पडला आहे. युरोपीय देशात महिलांना समान संधी दिली आहे, त्यामुळे ते देश प्रगतिशील झाले आहे. हीच बाब जाणून राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षणासाठी पुढाकार घेतला. शक्ती कायद्यामुळे राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना चाप बसेल. प्र. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, सृजनाच्या मौनामुळे स्त्रियांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्या घडूच नयेत. याकरिता समतोल साधण्याची गरज आहे.

यानिमित्त पपेट शो व प्रबोधनात्मक फलकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले. परिसंवादाचा हेतू संग्राम संस्थेच्या अध्यक्षा मीना शेषू यांनी विषद केला.

महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील यांनी पोक्सो, बालविवाह, सायबर क्राइम, आदींबाबत तत्काळ संपर्क साधण्यासाठी तयार केलेल्या फलकाविषयी विस्तृत माहिती दिली.

या परिसंवादामध्ये डॉ. मेघा पानसरे, धनाजी गुरव, डॉ. भारती पाटील व मीना शेषू यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य अजेय दळवी, प्राचार्य महादेव नरके, नेहा वाडेकर, यांच्यासह विविध अधिविभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### स्त्री-पुरुष समानतेविषयीची मोहीम १२ पर्यंत

कोल्हापूर जिल्ह्यात सांगलीतील संग्राम संस्थेच्यावतीने स्त्री-पुरुष समानतेविषयी 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' मोहीम १२ जानेवारीपर्यंत राबविले जाणार आहे. यासाठी संग्राम संस्थेच्या अध्यक्षा मीना शेषू, शशिकांत माने, शांतीलाल काळे, अनुप्रिया कदम, गौतम कांबळे, शिवाजी माळी, श्रुती मगदूम, विद्रोही महिला मंच आणि नजरिया मुस्लिम महिला मंचच्या कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभत आहे.

04 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री-पुरुष समानतेची बीजे शालेय जीवनात रुजवा

## पालकमंत्री सतेज पाटील : शिवाजी विद्यापीठात परिसंवाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

भविष्यातील पिढीत स्त्री-पुरुष समानता विचार निर्माण करायचे असतील तर ही बीजे शालेय जीवनातच रुजवा, असे आवाहन पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व संग्राम संस्था, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जबरदस्तीत कसली मर्दानगी या परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव व्ही. एन. शिंदे होते.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचे उद्घाटन मंत्री सतेज पाटील, मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले. मंत्री सतेज पाटील म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळूनदेखील महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदा करावा लागतो, याचा अर्थ आपण सुसंस्कारित पिढी घडवण्यात कमी पडलो की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. चांगल्या विषयाची सुरुवात कोल्हापूर जिल्ह्यातून होत असल्याचा अभिमान आहे.



कोल्हापूर : परिसंवाद उद्घाटन कार्यक्रमात बोलताना मंत्री सतेज पाटील. सोबत मंत्री हसन मुश्रीफ व मान्यवर.

ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, परिसंवादाच्या माध्यमातून समाजाचे निश्चितच प्रबोधन होईल. राज्य सरकारने जो शक्ती कायदा केला आहे त्याचा महिलांना फायदा तर होईलच; पण राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना चाप बसेल.

यावेळी महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या कायद्याची माहिती देणाऱ्या फलकाचे अनावरण करण्यात आले. स्वागत, प्रास्ताविक केंद्राच्या समन्वयक भारती पाटील यांनी केले.

परिसंवादाची संकल्पना आणि उद्देश संग्राम संस्थेच्या संस्थापिका मीना शेषू यांनी सांगितला. परिसंवादात प्रा. डॉ. मेघा पानसरे, कॉ. धनाजी गुरव, मीना शेषू, भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अजय दळवी, प्रा. महादेव नरके, नेहा वाडेकर आदींसह विविध विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

04 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समानतेचे बीज रुजविणे गरजेचे

## पालकमंत्री पाटील; शारदाबाई पवार अध्यासनातर्फे परिसंवाद

**कोल्हापूर, ता. ३ :** भावी पिढी स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची निर्माण करायची असेल तर त्याची बीजे व संस्कार शालेय जीवनात रुजविणे गरजेचे आहे. या अभियानाची सुरूवात राजर्षी शाहू महाराजांच्या जिल्ह्यातून होत आहे, ही अभिमानस्पद बाब आहे, असे मत पालकमंत्री सतेज पाटील यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री सतेज पाटील. यावेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, डॉ. भारती पाटील आदी.**

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व संग्राम संस्था (सांगली) यांच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' या परिसंवादाच्या उदघाटनावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, ''देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदा करावा लागतो. याचा अर्थ सुसंस्कार पिढी घडविण्यात कमी पडलो की काय, असा प्रश्न निर्माण होतो.''

ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, ''चूल व मूल या प्रवृत्तीमुळे भारतच काय आशिया खंड मागे पडला आहे. युरोपीय देशात महिलांना समान संधी दिली आहे. त्यामुळे ते देश प्रगतीशील झाले आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षणासाठी पुढाकार घेतला. सरकारने केलेल्या शक्ती कायद्यामुळे राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना चाप बसेल.''

शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संग्राम संस्थेच्या सरचिटणीस मीना शेषू, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील, प्रा. डॉ. मेघा पानसरे, धनाजी गुरव, प्राचार्य अजेय दळवी, प्राचार्य महादेव नरके, नेहा वाडेकर उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात परिसंवादात मार्गदर्शन करताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी ना. हसन मुश्रीफ, डॉ. व्ही. एन. शिंदे, मीना शेषू, डॉ. भारती पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शालेय जीवनातच स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची बीजे रुजवा : पालकमंत्री पाटील

## विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भावी पिढी स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांची निर्माण करायची असेल तर त्याची बीजे व संस्कार शालेय जीवनात रुजविणे गरजेचे आहे. या अभियानाची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांच्या जिल्ह्यातून होत आहे ही अभिमानस्पद बाब आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व संग्राम संस्था (सांगली) यांच्या वतीने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' या परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. तरीसुद्धा महिलांच्या सुरक्षितेसाठी कायदा करावा लागतो. याचा अर्थ सुसंस्कार पिढी घडविण्यात कमी पडलो की काय, असा प्रश्न निर्माण होतो.

ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, युरोपीय देशात महिलांना समान संधी दिली आहे. त्यामुळे ते देश प्रगतिशील झाले आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षणासाठी पुढाकार घेतला. सरकारने केलेल्या शक्ती कायद्यामुळे राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना चाप बसेल.

शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संग्राम संस्थेच्या सरचिटणीस मीना शेषू, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील, प्रा. डॉ. मेघा पानसरे, कॉ. धनाजी गुरव, प्राचार्य अजेय दळवी, प्राचार्य महादेव नरके, नेहा वाडेकर उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात आजपासून एएफएम प्रशिक्षण कार्यशाळा

## देशभरातील तज्ज्ञ सहभागी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रामध्ये स्ट्राइड प्रोग्राम आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत दि. ४ व ५ जानेवारीला दोन दिवसीय एएफएमवर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली असल्याची माहिती या केंद्राचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली. त्यांच्याच पुढाकाराने ही कार्यशाळा होत आहे. तिचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटनासाठी पाहुणे म्हणून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू अरुण पाटील उपस्थित राहणार असून, सी-मेट पुणेचे संचालक डॉ. भरत काळे ऑनलाइन सहभागी होणार आहेत. आयसीटी, मुंबईचे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित आणि महात्मा गांधी विद्यापीठ, तेलंगणाचे कुलगुरू प्रा. गोपाळ रेड्डी हेही ऑनलाइन उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेच्या सल्लागार समितीमध्ये देशभरातील अनेक नामवंत अशा शास्त्रज्ञांचा समावेश असून, पाहुणे म्हणून उत्तम दर्जाचे शास्त्रज्ञ लाभलेले आहेत. सैफमार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या दृष्टीने ही कार्यशाळा खूप महत्त्वाची आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन ऑनलाइन आणि ऑफलाइन केले असून आत्तापर्यंत जवळजवळ २५० संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी नोंदणी केली आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, नॅनोसायन्स, सूक्ष्मजीवशास्त्र असे विविध अधिविभाग एका व्यासपीठावर एकत्र येत आहेत. दोन दिवस विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे. या कार्यशाळेच्या यशस्वी नियोजनासाठी सैफ-सीएफसी प्रमुख प्रा. सोनकवडे यांच्यासोबत अधिविभागातील प्राध्यापक ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

लोकमत

# अभ्यासक्रम परीक्षा अर्जास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम व थेट द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाली आहे. त्यामुळे काही विद्यार्थी अद्यापही अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये गुरुवारी (दि. १३) विनाविलंब अर्ज भरता येतील.

04 JAN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे, अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. एम. व्ही. बाळवेकर, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे, अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात एएफएम प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रामध्ये स्ट्राइड प्रोग्राम आणि महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत दि. ४ व ५ जानेवारीला दोन दिवसीय एएफएमवर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. पाहुणे म्हणून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील उपस्थित राहणार असून, सी-एमईटी, पुणेचे डायरेक्टर डॉ. भरत काळे, आयसीटी मुंबईचे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित आणि महात्मा गांधी विद्यापीठ, तेलंगाणाचे कुलगुरू प्रा. गोपाळ रेड्डी ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेचे आयोजन ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने केले असून, २५० संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी कार्यशाळेसाठी नोंदणी केली आहे. या कार्यशाळेसाठी विद्यापीठातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, नॅनोसायन्स, बायोकेमिस्ट्री, जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र असे विविध अधिविभाग एकत्रित आले आहेत.

पुण्यनगरी

# व्यावसायिक अभ्यासक्रम परीक्षा अर्जास मुदतवाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम व थेट द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाल्याने काही विद्यार्थी अद्याप अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये १३ जानेवारीपर्यंत विनाविलंब अर्ज भरता येतील. महाविद्यालय तसेच पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज १४ जानेवारीपर्यंत ऑनलाईन मान्यता द्यावयाची आहे, तर १५ जानेवारीपर्यंत महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जांच्या याद्या सादर करायच्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली आहे.

04 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विद्यार्थ्यांनी मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण घ्यावे'

जरगनगर, ता. ३ : विद्यार्थ्यांनी मधुमक्षिका पालनाचे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन स्वतःची वेगळी ओळख तयार करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांनी आज येथे केले.

मधुअमृत मधुमक्षिका पालन संवर्धन व प्रशिक्षण केंद्रातर्फे आयोजित मधुमक्षिका पालन विषयावरील कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कात्यायनी येथील पैस शेती पर्यटन येथे कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

डॉ. जाधव म्हणाले, "ज्यांच्याकडे मधुमक्षिका पालन कौशल्य आहे, त्यांना या विषयातील सखोल शास्त्रीय ज्ञान विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातर्फे देण्यात येईल. त्यामुळे कौशल्य व शास्त्रीय ज्ञान एकत्रित आल्यास मधुमक्षिका पालनात गुणवत्ता व उत्पादकता वाढण्यास मदत होईल. पर्यावरण व कृषी पिकांसह फळबागा, वनाचे संवर्धन होण्यास मदत होईल. त्याचबरोबर जागतिक पातळीवर व्यवसायिक मधमाशांचा वापर तसेच त्यातील मूल्यवर्धित उत्पादनांचा व्यवसाय केल्यास स्वयंरोजगार व कौशल्य विकास करण्यास मोठा वाव मिळेल."



जरगनगर : मधुअमृत मधुमक्षिका पालन संवर्धन व प्रशिक्षण केंद्रातर्फे आयोजित मधुमक्षिका पालन विषयावरील कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. ए. डी. जाधव.

डॉ. एस. आर. यंकंची म्हणाले, "विद्यार्थ्यांसह शेतकऱ्यांनी मधुमक्षिका पालनात अधिक ज्ञान घ्यावे. त्यांना प्रशिक्षण, संशोधन व संवर्धनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करण्यात येईल."डॉ. धैर्यशील लाड, दामोदर पांढरे, संदेश जोशी, डॉ. पवन तेली, ज्योत्स्ना देसाई यांनी मार्गदर्शन केले. धर्माजी कांबळे, सचिन देसाई व संभाजी माडभगत यांनी मधुमक्षिका पेटी, त्याची रचना, हाताळणी, मधमाशीचे जीवन चक्र याविषयी माहिती दिली. केंद्राचे अध्यक्ष दयावान पाटील यांनी संयोजन केले. तेजस बोरगिरे, अक्षयराज पवार, प्रतीक सावंत यांनी सहकार्य केले. लोकनेते मोहनराव कदम कृषी महाविद्यालयासह सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक मधुमक्षिका पालक, कृषी व प्राणिशास्त्र विषयातले विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# महिला बेसबॉल संघ रवाना

टेंबलाईवाडी, ता. ३ : गुवाहाटी (आसाम) येथे ६ ते १० जानेवारी दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय महिला बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा महिला बेसबॉल संघ रवाना झाला. ऑल इंडिया असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी व रॉयल विद्यापीठातर्फे स्पर्धा होत आहे. स्पर्धेत विद्यापीठाचा महिला संघ पहिल्यांदा सहभागी होत आहे.

संघ असा : करिश्मा राजू कुडचे, गायत्री राजेंद्र जाधव, वाणी बालाजी ताटी, स्वप्नाली चंद्रकांत वायदंडे, पल्लवी विनोद कांबळे, पूनम नवनाथ चंदनशिवे, ऐश्वर्या रमेश पूरी, अश्विनी धनाजी बळे (सर्व महावीर महाविद्यालय), ऋतुजा अजित जाधव, स्नेहा उदय चौगुले (विवेकानंद कॉलेज), आकांक्षा दिलीप पाटील, सुजाता सुधीर थोरवडे, दिपाली आसरुबा करडे (सदगुरु गाडगे महाराज कॉलेज),

वैष्णवी संदीप पाटील (रामानंदनगर), शुभांगी अरुण पिसाळ (वेणूताई चव्हाण कॉलेज), निकिता अरुण पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स). त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले. प्रशिक्षकपदी डॉ. धनंजय पाटील, तर व्यवस्थापकपदी सुधाकर कुमकर आहेत.



**टेंबलाईवाडी : गुवाहाटी (आसाम) येथे होणाऱ्या अखिल भारतीय महिला बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झालेला शिवाजी विद्यापीठाचा महिला बेसबॉल संघ. शेजारी प्रभारी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. धनंजय पाटील, सुधाकर कुमकर.**

तरुण भारत

# व्यावसायिक विषयांच्या परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या २०२१–२२ ऑक्टोबर–नोव्हेंबरचे परीक्षा अर्ज भरण्यास फक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांना पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. विनाविलंब शुल्कासह १३ जानेवारीपर्यंत पदवी व पदव्युत्तरचे अर्ज विद्यार्थ्यांनी भरावयाचे आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

विद्यापीठ हिवाळी व्यावसायिक परीक्षेचा अर्ज विद्यार्थ्यांनी १३ जानेवारीपर्यंत भरावयाचा आहे. महाविद्यालय व अधिविभागांनी १४ जानेवारीपर्यंत अर्ज विनाविलंब शुल्कासह मंजूर करावयाचे आहेत. महाविद्यालय व अधिविभागांनी १५ जानेवारीपर्यंत अर्ज विद्यापीठातील परीक्षा विभागात सादर करावयाचे आहेत. यामध्ये शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाईल्स, बी–टेक, विधी, एमबीए, वायसीएसआरडीकडील अभ्यासक्रम व इतर सर्व अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्यासाठीच्या सुधारित तारखा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याच्या सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक पळसे यांनी परिपत्रकाव्दारे महाविद्यालयांना दिल्या आहेत.



■ **विनाविलंब शुल्कासह १३ जानेवारीपर्यंत विद्यापीठ परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदत**